# मेट्रो ३ प्रकल्पबाधितांचे लवकरच होणार पुनर्वसन

**मुंबई :** मुंबईतील संपूर्णपणे भुयारी मार्ग असलेल्या मेट्रो ३ मार्गावरील दक्षिण मुंबईतील प्रकल्प बाधितांच्या इमारती बांधण्याच्या हालचालींना वेग आला असल्याने प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या सर्व प्रकल्प बाधितांचे गिरगाव येथेच पुनर्वसन करण्यात येणार असून, त्यांच्यासाठी बांधण्यात येणाऱ्या भव्य इमारतीच्या निर्मितीचे कंत्राट मिळविण्यासाठी विविध बांधकाम व्यावसायिकांमध्ये चुरस लागली आहे. कुलाबा-वांद्रे- सिप्झ दरम्यान मेट्रो-३ प्रकल्पाची उभारणीचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशद्वारे सुरु असून लवकरच हे काम पूर्णत्वास जाणार असल्याने प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाचेही काम लवकर करण्यासाठी एमएमआरसीएलकडून प्रयत्न केला जात आहे. मेट्रो-३च्या मार्गातील चिराबाजार, काळबादेवी-गिरगाव भागातील १७ उपकरप्राप्त इमारतींसह २१ इमारतींमधील विस्थापितांचे याच भागात पुनर्वसन करण्यात येणार आहे. हे पुनर्वसन करताना सध्या ज्यांचे घर २०२ चौरस फुटांचे आहे त्यांना ४०५ चौरस फूट, २०२ ते ३०० चौरस फुटांचे घर असणाऱ्यांना ६०० चौरस फूट, ४४४ चौरस फुटांपर्यंतचे घर असणाऱ्यांना क्षेत्रफळाच्या ३५ टक्के अधिक क्षेत्रफळाचे घर देण्याचे जवळपास निश्चित झाले आहे.